

बनावट पदव्यांचे 'लग्नकनेक्शन'

श्रीमंत घरची वधू मिळावी म्हणून लाखो रुपये मोजले

लोकसत्ता वार्ताहर

रॅकेटची व्याप्ती वाढण्याची शक्यता

बनावट पदव्या कोणाकडून तयार केल्या जात होत्या, त्या कोणत्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या जात होत्या, त्यासाठी किती रक्कम आकारली जात होती आणि या व्यवहारात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. बनावट पदवी विक्रीच्या या रॅकेटने आता शिक्षण क्षेत्राबरोबरच विवाहसंस्थेतही फसवणुकीचे धक्कादायक धागे उघड केले आहे.

चंद्रपूर : नामांकित विद्यापीठांच्या बनावट पदवी आणि गुणपत्रिका विक्रीचे रॅकेट उघडकीस आल्यानंतर तपासाला धक्कादायक वळण मिळाले आहे. विवाहासाठी संपन्न कुटुंबातील मुलगी मिळावी, यासाठी काही युवकांनी लाखो रुपये मोजून बनावट पदव्या खरेदी केल्याची माहिती तपासात समोर आली आहे. दरम्यान, दुर्गापूर पोलिसांच्या तपासात आरोपी परिमल गौरकर आणि अक्षय खोब्रागडे यांच्याकडून कर्नाटक स्टेट ओपन युनिव्हर्सिटीच्या आणखी काही बनावट पदव्या हस्तगत केल्याने या रॅकेटची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

या प्रकरणातील दोन्ही आरोपींना मंगळवारी जिल्हा व सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने परिमल गौरकर आणि अक्षय खोब्रागडे यांच्या पोलीस कोठडीत ३ सप्टेंबरपर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे बनावट पदवी प्रकरणाच्या तपासाला आणखी गती मिळण्याची शक्यता आहे. दुर्गापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष शेगावकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या तपासात बनावट पदवी आणि गुणपत्रिका विक्रीचे मोठे रॅकेट उघडकीस आले. या प्रकरणात परिमल गौरकर, अक्षय खोब्रागडे आणि वैभव सोनुले या तिघांना अटक करण्यात आली होती. त्यापैकी वैभव सोनुले याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

या प्रकरणातील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे बनावट पदवीचा वापर विवाह जुळवण्यासाठीही झाल्याचे तपासात समोर आले आहे. काही युवकांनी आपली शैक्षणिक पात्रता मोठी भासवून श्रीमंत कुटुंबातील मुलगी मिळावी, या उद्देशाने लाखोंचा खर्च करून बनावट पदव्या खरेदी केल्याची माहिती उघड झाली आहे.

मुंबई-अमरावती विमानसेवा आठवड्यातून पाच दिवस!

४ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू होणार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

अमरावती : अलायन्स एअर कंपनीची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा पुन्हा एकदा आठवड्यातून पाच दिवस सुरू होणार आहे, पण त्यासाठी प्रवाशांना महिनाभर प्रतीक्षा करावी लागणार आहे. येत्या ४ ऑक्टोबरपासून दर आठवड्याला पाच दिवस ही सेवा उपलब्ध होऊ शकेल.

अलायन्स एअर कंपनीने 'ऑपरेशनल' कारण दर्शवून ही सेवा चार दिवस करण्याचा निर्णय घेतला होता. हा बदल २५ ऑगस्टपासून झाला. अलायन्स एअरने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांना ई-मेल पाठवून वेळापत्रकातील बदलाविषयी माहिती दिली होती. दीपक कपूर यांनी त्यानंतर समाज माध्यमांद्वारे प्रवाशांना २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत आठवड्यातून चारच दिवस विमानसेवा सुरू राहील, अशी सूचना दिली होती. आता ४ ऑक्टोबरपासून आठवड्यातून पाच दिवस विमान प्रवासाचे बुकिंग सुरू झाले आहे.

सध्या दर आठवड्याला रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे चार दिवस मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरू आहे. ४ ऑक्टोबरपासून दर रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार आणि शुक्रवार असे पाच दिवस विमानसेवा उपलब्ध राहणार आहे. विमानाच्या वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुंबई विमानतळावरून सकाळी ७.०५ वाजता विमान उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहचते. तर परतीच्या वेळी अमरावती विमानतळावरून सकाळी ९.१५ वाजता विमानोड्डाण होते आणि सकाळी ११ वाजता मुंबई विमानतळावर पोहचते.

शासकीय आयटीआयमध्ये लवकरच अधिकृत 'वाहन चालक प्रशिक्षण शाळा'

१६५ संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी

लोकसत्ता वार्ताहर

खासगी ड्रायव्हिंग स्कूल्सचा विरोध!

शासकीय आयटीआयमध्ये अत्यंत रास्त दरात आणि अधिकृत ड्रायव्हिंग ट्रेनिंग मिळणार असल्याने आपल्या व्यवसायावर कुऱ्हाड पडेल, अशी भीती खासगी ड्रायव्हिंग स्कूल चालकांना वाटू लागली आहे. त्यामुळे त्यांनी या निर्णयाला विरोध दर्शवण्यास सुरुवात केली आहे.

यवतमाळ : गाड्यांचे पार्ट्स दुरुस्त करायला शिकतानाच आता हाताखाली स्टिअरिंगही पकडता येणार आहे. यवतमाळसह राज्यातील तब्बल १६५ शासकीय आयटीआयमध्ये लवकरच अधिकृत 'वाहन चालक प्रशिक्षण शाळा' सुरू होत आहेत. कौशल्य विकासासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ड्रायव्हिंगचे धडे देऊन रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे.

तंत्रशिक्षण व कौशल्य विकास विभागाने आयटीआयच्या विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. ज्या संस्थांमध्ये 'मेकॅनिक मोटार व्हेइकल' हा ट्रेड उपलब्ध आहे, तिथे ही ड्रायव्हिंग स्कूल सुरू केली जाईल. बऱ्याचदा तांत्रिक ज्ञान असूनही ड्रायव्हिंग येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना काहीं नोकऱ्या गमावाव्या लागतात. आता ही अडचण दूर होईल. केवळ आयटीआयचे नियमित विद्यार्थीच नाही, तर बाहेरचे तरुणही अल्प दरात इथे ड्रायव्हिंग शिकू शकतील. या उपक्रमासाठी आयटीआय प्रांगणात ड्रायव्हिंग ट्रॅक उभारले जात असून आवश्यक वाहनांची सोय केली जात आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून अधिकृत परवानगी मिळवण्यासाठीची कागदपत्रे आणि अर्जाची प्रक्रिया सुरू झाली आहे.

आयटीआयच्या अधिकृत केंद्रावर जाऊन ड्रायव्हिंग स्कूलचा अर्ज भरावा लागेल. आरटीओच्या नियमांनुसार सुरुवातीला 'लर्निंग लायसन्स'साठी (शिकाऊ परवाना) ऑनलाइन परीक्षा द्यावी लागेल. लायसन्स मिळाल्यावर आयटीआयमधील प्रशिक्षित निदेशकांकडून प्रत्यक्ष ड्रायव्हिंगचे धडे मिळतील. चाचणी पूर्ण झाल्यावर पक्के लायसन्स हातात येईल. यवतमाळ येथील आयटीआयचा प्रस्ताव आमच्याकडे आला असून त्याला लवकरच मंजुरी देण्यात येईल. ड्रायव्हिंग स्कूलसाठी परिवहन नियमानुसार ऑनलाइन अर्ज करावा लागतो. यासाठी दोन्ही बाजूंनी ब्रेक व क्लच असणारी (ड्युअल कंट्रोल) कार आणि नियमानुसार पात्र प्रशिक्षक असणे बंधनकारक आहे, अशी माहिती यवतमाळचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल सूर्यवंशी यांनी दिली.

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महावीर उद्यान समोर
रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vidarbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषतः खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री ''जे आहे जेथे आहे'' तत्वावर, ''जे काही आहे ते आहे'' तत्वावर आणि ''ज्या स्थितीत आहे तसे आहे'' तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : 09/10/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती **ard.vidarbha@bankofindia.bank.in या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री स्वप्नील अग्रवाल मो. 8888334383, श्री शुभम मस्के मो. 8237771144 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)**

कर्जदार, सह-कर्जदार, प्रोपायटर गहाणदार, जमानतदाराचे नांव, शाखेचे नाव, मालमत्ता आयडी	संपत्तीचे विवरण	एकुण थकबाकी	ताबा प्रकार	नवीन लिलावाची सुरुवातीची किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.
कर्जदार/गहाणदार : मे. माधव ट्रेडिंग प्रो. श्रीमती ममता सचिन ढोले BKIDWAROODMT शाखा : वरुड	जमिनीचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि खुळा निवासी जमिनीवर उभारलेले आणि स्थापित केलेले सर्व संरचना, शेड मध्ये मालमत्ता क्रमांक 93/1, प्लॉट क्रमांक 12ए2 (लेआउट प्लॉट क्रमांक 12ए चा भाग), सर्वेक्षण क्रमांक 506/3, 507/1, संगणकीकृत 7/12 नुसार, सर्वेक्षण क्रमांक 506/3/507/1/12ए2, वॉर्ड क्रमांक ६, जिजाऊ नगर, साखरपुरा जवळ, मौजा वरुड (भाग 1), तालुका वरुड, जिल्हा अमरावती-444906, आराजी क्षेत्रफळ 130.44 चौरस मीटर (1403.53 चौरस फूट), श्रीमती ममता सचिन ढोले (कर्जदार- गहाणदार) यांच्या नावाने.	रू. 44.56 लक्ष O/S + मालमत्तेच्या तारखेपासून युसीआय + इतर आनुषंगिक खर्च आणि शुल्क	भौतिक	रु. 19,01,000/-	रु. 1,90,100/-

ई-लिलवाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव **''जे आहे जेथे आहे, आणि '' जे काही आहे ते आहे आणि ''ज्या स्थितीत आहे तसे आहे''** तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.

2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया **https://bankofindia.bank.in** ला भेट द्या.
a) ई-लिलाव सेवा पुरवठा दाराच्या वेबसाईटचा पत्ता : **https://baanknet.com/.** बोलीदार हे **https://baanknet.com/** येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.
टप्पा - 1 : बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.
टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.
टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईएफटी/हस्तांतरण ई-लिलाव पलॅटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.
टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकालः इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपुर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.

3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी ठेवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा हयाची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रयिध्द होणे म्हणजे कुणाचिही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सध्याचा आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्यात येणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईल बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.

4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : **15/09/2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत** असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.

6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.

7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असावी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.

8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परतावा करण्यात येईल.

9) बँकांच्या प्रतिकात्मक ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालया तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपूर्द केला जाईल.

10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) ठेवीवर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्यामध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणासाठी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किंमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.

11) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावना-याने लिलावाशी संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.

12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्कची अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक किंवा ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊ नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बँकअप त्यांच्याकडे असावा.

13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-1 ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेजे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, संवैधानिक शुल्क आणि असंवैधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.

14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पुढे ढकलणे/ रदद् करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.

15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदारांच्या/अर्जदारांच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.

16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.

17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद् केली जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिनेच केल्या आहेत असे मानले जाईल.

18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामीनदारांना विक्री सुचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांची संवैधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संदर्भात थकीत देणी आणि व्याजासह मासिक दंड, शुल्क आणि भार वगैरे यांचा भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेचा भरणा 60 दिवसांमध्ये करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करु शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुमच्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, मागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेला सर्व खर्च प्राधिकृत अधिका-याकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुमच्या लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा) ईएमडी (रकमेचा भरणा करुन सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 02/09/2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

'एनआयसीयू'सह अतिदक्षता विभागांचे १५ दिवसांत विद्युत लेखापरीक्षण

अमरावतीच्या दुर्घटनेनंतर चंद्रपूर प्रशासन ॲक्शन मोडमध्ये

लोकसत्ता वार्ताहर

कमी क्षमतेच्या युपीएस प्रकरणी जबाबदारी निश्चित होणार

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे आवश्यक क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचे यूपीएस बसवण्याच्या प्रकरणाचीही प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. यासाठी जबाबदार यंत्रणा अथवा व्यक्तीचा अहवाल सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश अधिष्ठात्यांना देण्यात आले आहेत.

चंद्रपूर : अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागातील आगीच्या घटनेनंतर चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने रुग्णालयांच्या सुरक्षेबाबत कडक भूमिका घेतली आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे विद्युत आणि अग्निसुरक्षा लेखापरीक्षण एका महिन्यात पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्ष वसुमना पंत यांनी दिले. विशेषतः एनआयसीयू, पीआयसीयू, एमआयसीयू, एसआयसीयू आणि एसएनसीयू यांसारख्या अतिदक्षता विभागांचे विद्युत लेखापरीक्षण १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी पंत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील विस कलमी सभागृहात रुग्णालयांतील अग्निसुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी तातडीची बैठक झाली. आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, विद्युत आणि आपत्ती व्यवस्थापन विभागातील वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. नवजात शिशू आणि गंभीर रुग्णांच्या जीविताशी संबंधित अतिदक्षता विभागांतील विद्युत यंत्रणेतील त्रुटी, ओव्हरलोडिंग, शॉर्टसर्किट अथवा आपत्कालीन वीजपुरवठ्यातील बिघाड गंभीर ठरू शकतो. त्यामुळे अतिदक्षता विभागांचे विद्युत लेखापरीक्षण तातडीने करून त्रुटी दूर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी, विद्युत विभाग आणि विद्युत निरीक्षक यांच्यावर सोपविण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांचे अग्निसुरक्षा लेखापरीक्षण करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. अग्निशामक यंत्रणा कार्यरत आहे का, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग सुरक्षित व उपलब्ध आहेत का, विद्युत व्यवस्था धोकामुक्त आहे का, यासह आवश्यक सुरक्षा उपाययोजनांची प्रत्यक्ष पाहणी करण्यावर भर देण्यात आला. विद्युत व अग्निसुरक्षा लेखापरीक्षणाचा गोषवारा सात दिवसांत, तर संपूर्ण लेखापरीक्षण एका महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अमरावतीतील दुर्घटनेची पुनरावृत्ती चंद्रपुरात होऊ नये, यासाठी संभाव्य धोके आधीच ओळखून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. केवळ अहवाल तयार करून थांबू नका; प्रत्यक्ष सुरक्षा उपाययोजना करा, अशी स्पष्ट भूमिका प्रशासनाने घेतली आहे. रुग्णालयांतील विद्युत व अग्निसुरक्षेबाबत संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवण्याची जबाबदारी जिल्हा शल्यचिकित्सकांवर सोपविण्यात आली आहे. रुग्णालयांतील सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही हयगय झाल्यास त्याचे गंभीर परिणाम रुग्णांच्या जीवितावर होऊ शकतात. त्यामुळे 'सुरक्षेत तडजोड नाही' या भूमिकेतून निर्धारित मुदतीत सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

माजी नक्षल नेता भूपती नव्या भूमिकेत

लोकसत्ता वार्ताहर

गोंडवाना विद्यापीठात समन्वयक म्हणून नियुक्ती. आदिवासींना पेसा, वनहक्कासाठी मार्गदर्शन करणार.

संघर्षातून समाजसेवेच्या वाटेवर

गोंडवाना विद्यापीठाच्या 'एकल' उपक्रमांतर्गत आतापर्यंत जिल्ह्यातील १,७४९ पैकी ५३२ ग्रामसभांचे सक्षमीकरण करण्यात आले आहे. बंदुकीच्या मार्गावरून लोकशाहीच्या मार्गावर आलेल्या भूपतींसाठी ही केवळ नोकरी नसून, भूतकाळातून वर्तमानाकडे आणि संघर्षातून समाजसेवेच्या वाटेवर झालेला एक महत्त्वाचा प्रवास ठरणार आहे.

गडचिरोली : कधीकाळी हातात बंदूक घेऊन जंगलात वावरणारे हात आता आदिवासी ग्रामस्थांच्या हक्कांसाठी कागदपत्रे हाताळणार आहेत. नक्षलवादी चळवळीतील प्रमुख नेता म्हणून ओळखले जाणारे मल्लोजुला वेणुगोपाल राव उर्फ भूपती यांनी शस्त्राचा मार्ग सोडल्यानंतर त्यांच्या आयुष्याला आता नवी दिशा मिळाली आहे. गोंडवाना विद्यापीठाने त्यांची 'एकल' उपक्रमात समन्वयक म्हणून नियुक्ती केली असून, ग्रामसभा आणि आदिवासींना त्यांच्या कायदेशीर हक्कांसाठी मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

भूपती यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये गडचिरोली येथे ६१ सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले होते. अनेक वर्षे जंगलातील नक्षलवादी चळवळीत सक्रिय राहिल्यानंतर त्यांनी मुख्य प्रवाहात परतण्याचा निर्णय घेतला. आता त्याच जंगलातील आदिवासींच्या प्रश्नांसाठी, मात्र पूर्णपणे वेगळ्या भूमिकेतून, काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक एम. रमेश यांनी भूपती यांना आदिवासी समाजाच्या प्रश्नांची असलेली जाण आणि प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन त्यांचे नाव विद्यापीठाकडे सुचवले. भूपती यांची नियुक्ती तीन महिन्यांच्या करारावर करण्यात आली असून, त्यांना दरमहा ३० हजार रुपये मानधन मिळणार आहे.

'एकल' उपक्रमांतर्गत ग्रामसभांना पेसा कायदा आणि वनहक्क कायद्यानुसार असलेल्या अधिकारांची माहिती देणे, वनहक्कांचे दावे दाखल करताना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास मदत करणे, दाव्यांमधील त्रुटी दूर करून ते प्रशासनाकडे सादर करण्यासाठी समन्वय साधणे, अशी त्यांची भूमिका असेल. ग्रामसभा, ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणूनही भूपती काम करतील. विशेष म्हणजे, ज्या आदिवासी भागातील प्रश्नांना ते पूर्वी एका वेगळ्या भूमिकेतून पाहत होते, त्याच भागातील नागरिकांना आता कायदेशीर मार्गाने त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी ते प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या नियुक्तीला गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांत बोकारे यांनी दुजोरा दिला आहे.

बँक ऑफ इंडिया

नातं बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय : विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस,
महावीर उद्यान समोर, रामनगर,वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338
ई मेल : ard.vidarbha@bankofindia.bank.in

मागणी सूचना

सरफेसी ॲक्ट 2002 च्या अनुच्छेद 13 (2) च्या अनुपालनार्थ बँकेच्या प्राधिकृत अधिका-यांनी खाली नमूद केलेल्या कर्जदार/सह-कर्जदार यांना मागणी सूचना जारी करुन सदर नोटीसीच्या तारखेपासून 60 दिवसाच्या आत थकबाकी जमा करण्याची सूचना नमूद केलेल्या तपशीलानुसार दिली होती. पण कर्जदार/सह-कर्जदार यांना पाठविलेली सूचना प्रतिसाद न मिळता परत आली आहे म्हणून खालील कर्जदार/सह-कर्जदार यांचे लक्ष वेधण्यासाठी ही सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

कर्जदार/सह-कर्जदार आणि जमानतदार यांचे नाव आणि पत्ता आणि शाखा	कर्ज सुविधेचे स्वरुप आणि मंजूर मर्यादा	थकबाकी	मागणी सुचना दिनांक	सुरक्षित स्थावर मालमत्तेचा स्वरुप
मे. श्री ट्रांसपोर्ट तर्फे श्री प्रदीप मधुकरराव गाडगे पत्ता 1 : रा.आसोला, जि.यवतमाळ-445001 पत्ता 2 : साने गुरुजी नगर 2 लोहारा बायपास, एसओएस शाळेजवळ, यवतमाळ शाखा : यवतमाळ	मुदत कर्ज 063072310000111 रु.8,50,000/- (रु.आठ लक्ष पन्नास हजार फक्त)	रुपये 5,30,732.92 + आकारले न गेलेले व्याज (सध्या @ 10.60 % प्रति वर्ष) मासिक चक्रवाढ पध्दतीने आणि + बँकेला आलेले सर्व खर्च आणि शुल्क यासह.	12/08/2026	तारण ठेवलेला वाहन : Ashok Leyland Bada Dost I4 TNDD Diesel Truck Reg. No.: MH29BE5387 Chassis No.: MB1AB42E6NRHY0583 Engine No.: HNH033684P Date of Reg.: 28.06.2022 Color: Irish Cream Month of Manufacture: 05/2022

कर्जदार/सह-कर्जदार यांना याद्वारे कळविण्यात येते की, सरफेसी ॲक्टच्या तरतुदीनुसार बँकेच्या प्राधिकृत अधिका-यांना वरील उल्लेखीत तारण मालमत्तेचा/सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेऊन नंतर लिलाव करण्याचा अधिकार आहे. जर कर्जदार/सह-कर्जदार यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या 60 दिवसांच्या आत उपरोल्लेखित रकमेची परतफेड केली नाही तर सरफेसी ॲक्टच्या अनुच्छेद 13(13) अंतर्गत कर्जदार यांना बँकेच्या लिखित संमतीशिवाय वरील सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतर विक्री भाडे करार किंवा इतर बाबी करण्यास मज्जाव करण्यात आला आहे. ही सार्वजनिक सूचना सरफेसी ॲक्ट 2002 च्या अनुच्छेद 13(2) अंतर्गत ग्राहय धरण्यात यावी. कर्जदार यांना सूचित करण्यात येते की, अनुच्छेद 13(2) अंतर्गत जारी मूळ नोटीस त्यांनी निम्न स्वाक्षरीकाराकडून कोणत्याही कामकाजाच्या दिवशी पोच पावती देऊन स्वीकारावी.

स्थळ:वर्धा
दिनांक : 02.09.2026

(कुठल्याही प्रकारच्या विसंगतीच्या बाबतीत सदर नोटीसची इंग्रजी आवृत्ती ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी,बँक ऑफ इंडिया

डॉक्टरकडून तरुणीचा विनयभंग

अकोला : शहरातील रामनगर येथील होमिओपॅथी त्वचारोग तज्ज्ञ डॉ. प्रवीण श्यामसुंदर अग्रवाल याने उपचाराच्या नावाखाली नागपूर येथील तरुणी रुग्णासोबत अश्लील वर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. याप्रकरणी सिव्हिल लाईन पोलिसांनी गुन्हा दाखल ४६ वर्षीय डॉक्टराला बेड्या ठोकल्या. विशेष म्हणजे, या अगोदरही त्या डॉक्टरवर विनयभंगासह इतर गुन्हे दाखल आहेत. या घटनेमुळे अकोल्यातील वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली. नागपूर येथील एक तरुणी उपचारासाठी अकोल्यात आली होती. ती डॉ. प्रवीण अग्रवाल याच्या दवाखान्यात गेली. सर्व रुग्ण गेल्यानंतर तीला चेंबरमध्ये बोलावण्यात आले. तपासणी आणि उपचार करण्याच्या बहाण्याने तरुणीचा विनयभंग केला.